पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **२८/०८/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा सोमवार दिनांक **२८/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.फुगे भिमाबाई पोपट
६. मा.मंगला अशोक कदम
७. मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
८. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
९. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.पाटील – कार्यकारी अभियंता, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) महापौर चषक वेटलिफ्टींग स्पर्धा चिंचवड येथे घेणेबाबत –मा.अंबरनाथ कांबळे, मा.मंगला कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पुनावळे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) कै.धोंडीबा गणपत फुगे, विरंगुळाकेंद्र दिघी रोड व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) कै.संजय काळे हेल्थ क्लब, निगडी, से.२८ सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.सचिन भोसले, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **११/०८/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २८/०८/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९३/२०१७, दि.३०/०६/२०१७

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जूलै २०१७ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१७-१८ (पुरुष गट, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/- ( अक्षरी र.रु.तीन लाख, ब्याऐंशी हजार, नऊशे साठ फक्त ) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेस, सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरित र.रु.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर्स, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार, इ.निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे बाबत मा.अति.आयुक्त यांची शिफारस असली तरी पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांनी स्पर्धेची तारीख व स्पर्धा मान्यता दिल्यानंतर स्पर्धा आयोजित करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २८/०८/२०१७
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.मंगला कदम
संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.मंगला कदम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिंचवड प्रभाग क्रमांक १८ या ठिकाणी असलेल्या मोरया गोसावी क्रीडांगण या मैदानावर महापौर चषक वेटलिफ्टींग स्पर्धा माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २८/०८/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुनावळे प्रभाग क्र.२५ मधील व्यायामशाळा गुरुदेव मित्रमंडळाला ११ महिने कराराने दरमहा र.रु.२०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २८/०८/२०१७

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.धोंडीबा गणपत फुगे, विरंगुळा कैंद्र, प्रभाग क्र.०७ मधील मनपाची दिघी रोड व्यायामशाळा पठारे लांडगे तालिम व्यायाम मंडळ यांना ११ महिने कराराने दरमहा र.रु.२०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २८/०८/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

से.२८, निगडी मधील कै.संजय काळे हेल्थ क्लब ही व्यायामशाळा दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार पाच वर्षे कालावधीकरीता एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेस चालविण्या करिता देण्यात यावी. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचा रजिस्टर नंबर महा १८५७ / २०१२ हा आहे. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरची व्यायामशाळा एकविरा सेवा संघ, चिंचवड यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २८/०८/२०१७

सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.सचिन भोसले, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या ताब्यातील व सध्या सेवाशुल्क तत्वावर साई शारदा महिला बचतगट यांना चालविण्यास देण्यात आलेली व्यायामशाळा तिची मुदत ०१/११/२०१३ रोजी संपलेली आहे. सदरची व्यायामशाळा पुन्हा साई शारदा महिला बचतगट यांना ठरावाचे तारखेपासून पुढे ११ महिन्यांसाठी चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच साई ऍक्वामरिन जलतरण तलाव, संभाजीनगर हा साई शारदा महिला बचतगट यांना सेवाशुल्क तत्तावर ११ महिन्यांसाठी चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लक्ष्मणशेठ सोपान सस्ते )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०८४/२०१७
दिनांक : २९/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.